Over 25 Years of Celebrating the Arts

India Foundation for the Arts

I F A

# सरकारी अनुदानप्राप्त आणि ना-नफा तत्वावर चालणाऱ्या शाळांकडून

# त्यांच्या

# कला प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत असणाऱ्या

# आर्टस् इंटिग्रेटेड प्रकल्पासाठी

# प्रस्ताव मागवत आहे

**प्रस्ताव पाठवायची अंतिम तारीख: 18 नोव्हेंबर 2023**



Image: Kalkeri Sangeet Vidyalaya, from an Arts Education National School Project implemented in 2022-2023

इंडिया फाऊंडेशन फॉर द आर्टस्, भारतभरात, महानगर परिसराच्या बाहेर असणाऱ्या, सरकारी अनुदानप्राप्त आणि ना-ना-नफा तत्वावर चालणाऱ्या शाळांमधे, कला शिक्षणाच्या माध्यमातून, शिक्षण प्रभावी करण्यासाठी, निरनिराळे आर्टस् आर्टस् इंटिग्रेटेड प्रकल्प चालवू इच्छित आहे.

आयएफएचा कला प्रशिक्षण कार्यक्रम, काली-कालीसुचे (म्हणजे कन्नड भाषेत 'शिका' आणि 'शिकवा') उद्दिष्ट, शाळांमधून, 'शिक्षण' एक आकर्षक आणि आनंददायी अनुभव बनावा हे आहे. यांत निरनिराळ्या कलाप्रकारांचा वापर अभ्यासक्रमाशी संलग्न शिकवण्याच्या पद्धतींत केला जाईल.

या संकल्पनेला अनुसरून, आयएफए, सरकारी अनुदानप्राप्त आणि ना-नफा तत्वावर चालणाऱ्या शाळांकडून, असे प्रस्ताव प्रस्ताव मागवत आहे, ज्यांत, उत्तमप्रकारे कला प्रकार समाविष्ट करून, शिकवण्याच्या पद्धतींचा अवलंब केला जाईल जाईल आणि ज्यामुळे मुलांमधल्या जिज्ञासा आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळेल.

आमच्या मागील वर्षांमधील प्रकल्पांबद्दल जाणून घेण्यासाठी इथे क्लिक करा:

## प्रकल्प कसा असावा

प्रकल्पाला पुढील एक अथवा अधिक उद्दिष्टे असावीत:

- स्थानिक कलाप्रकार किंवा सांस्कृतिक वहिवाटेचा वापर वर्गात शिकण्यासाठी, शिकविण्यासाठी केला जावा
- सर्व विषय शिकताना, शिकवताना त्यात कलाप्रकारांचा अंतर्भाव केला जावा
- मुलांच्या वैय्यक्तिक अनुभवांचा अंतर्भाव वर्गात शिकण्यासाठी केला जावा
- समाजातील स्थानिक कलाकार आणि संसाधनांचा वापर केला जावा

**प्रकल्पाचा कालावधी:** कमीतकमी **एक वर्ष** ते जास्तीतजास्त **दीड वर्ष**

**अर्थसहाय्य (Budget):** जास्तीतजास्त रुपये ४,००,०००/- **(रुपये चार लाख)**

**अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख:** 18 नोव्हेंबर 2023

## प्रस्ताव कोण पाठवू शकेल?

महानगर परिसराच्या बाहेर असणाऱ्या, सरकारी अनुदानप्राप्त आणि ना-नफा तत्वावर चालणाऱ्या शाळा. संस्था स्थानिक भाषांमधे काम करणारी असावी आणि संस्थेचा या गोष्टीवर विश्वास असावा की कला आणि संस्कृती ही शिकविणे आणि शिकण्याची अविभाज्य अंगे आहेत.

## पात्रता:

- शाळेची मालकी / संचालन हे, सोसायटीज् रेजिस्ट्रेशन ऍक्ट १८६० किंवा इंडियन ट्रस्ट ऍक्ट १८८२ च्या अंतर्गत अंतर्गत नोंदणीकृत संस्थेकडे असावे
- संस्था कमीतकमी तीन वर्षे अस्तित्वात असणे गरजेचे आहे
- संस्थेचे कमीतकमी दोन वर्षांचे हिशोब ऑडिट केलेले असणे गरजेचे आहे
- संस्थेकडे पॅन नंबर असणे आवश्यक आहे

## प्रस्ताव पाठवायची पद्धत:

- प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असावा:
    - प्रकल्पाचे नाव
    - शाळेची थोडक्यात माहिती आणि शाळेचे ध्येय आणि उद्दिष्टे
    - विद्यार्थ्यांची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी
    - प्रस्तावित प्रकल्पाची उद्दिष्टे
    - कार्यपद्धती आणि तपशीलवार योजना
    - प्रकल्पात सहभागी होणाऱ्या लोकांची माहिती
    - प्रकल्पाचे मूल्यमापन कसे करावे याची पद्धत

    - प्रकल्पाची फलिते
    - तपशीलवार खर्च
- प्रकल्पाला जोडावयाची कागदपत्रे:
    - ट्रस्ट डीडची प्रत / मेमोरँडम ऑफ असोसिएशन
    - सद्य विश्वस्तांची / सदस्यांची यादी आणि थोडक्यात माहिती
    - 12A खाली / सोसायटी ऍक्टखाली नोंदणी केल्याची प्रत
    - ऑडिट रिपोर्ट / मागील कमीतकमी दोन वर्षांचे ऑडिट रिपोर्ट
    - पॅनची प्रत
    - जर तुम्ही आधी कधी किंवा सध्या कोणता कला शिक्षण प्रकल्प चालवत असाल तर त्याचे तपशील तपशील

## निवड प्रक्रिया:

- निवडक प्रस्ताव एका बाह्य समितीद्वारे तपासली जातील आणि अर्जदारांना या समितीसमोर त्यांच्या प्रकल्पाच्या संकल्पना सादर कराव्या लागतील. निवड झालेल्या प्रकल्पांची यादी फेब्रुवारी 2024 मध्ये जाहीर जाहीर करण्यात येईल. प्रकल्प निवडीबाबत आयएफएचा निर्णय अंतिम असेल.

## प्रस्ताव सादरीकरण:

- तुम्ही तुमचा प्रस्ताव कोणत्याही भारतीय भाषेत किंवा इंग्लिशमधे लिहू शकता.
- तुमचा अंतिम प्रस्ताव, त्याला संलग्न कागदपत्रांसह, २५ MB पर्यंत आकार असलेल्या एकाच ईमेलद्वारे, शनिवार, 18 नोव्हेंबर 2023 पूर्वी, krishna@indiaifa.org इथे पाठवा.

**लक्षात घ्या की अपूर्ण प्रस्ताव आणि पात्रता निकष पूर्ण करू न शकणाऱ्या संस्थांच्या प्रस्तावाची दखल घेतली जाणार नाही.निवड**

**झालेले सर्व प्रकल्प आयएफएद्वारे चालविले जातील.**

**कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.**